# अर्थपूर्ण

एप्रिल २०१४ | ₹ ४०
पुणे, वर्ष ४, अंक ४

आर्थिक साक्षरता + पारदर्शकता = स्वाभिमानी भारत



# अर्थपूर्ण

संपादक
यमाजी मालकर

सहसंपादक
सम्राट शिरवळकर

editor.arthapurna@gmail.com

'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.
१०४ निलगिरी अपार्टमेंट्स, दुसरा मजला,
कर्वे रस्ता, कोथरूड, पुणे - ४११०३८
**फोन : ०२०- ३२६००९९६**
www.arthapurna.org

एप्रिल २०१४

वर्ष चौथे
अंक चौथा

**डिझाईन :**
ऑफबीट कॉन्सेप्टस्, पुणे.
९८८१०९८०१०

**मुखपृष्ठ :**
प्रशांत काळे

**अक्षर जुळणी :**
माधुरी खत्री

**मुद्रितशोधन :**
विजय जोशी

**व्यवस्थापन साहाय्य :**
महेंद्र बनसोडे

**जाहिरात संपर्क**
राजन मिडिया स्टेशन
फोन ०२०-३०२९२४४४,
३०२९२४४५
rajanmediastation@gmail.com,
myrajanmediastation@gmail.com

**वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी**
व्यवहारासाठी संपर्कः
०२०-३२६००९९६
९९२१९२६५३८
arthapurna.monthly@gmail.com



'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील मजकुराची सत्यता पडताळून आणि योग्य शहानिशा करूनच वाचकांनी जाहिरातीबाबत कोणतेही व्यवहार करावेत. जाहिरातीत केलेल्या दाव्यांबाबत 'अर्थपूर्ण' कोणत्याही प्रकारची हमी घेत नाही.


# अनुक्रमणिका


०६ **राजकारणाच्या शुद्धीकरणाचे मार्ग**...यमाजी मालकर

०८ **निवडणुकीतील बेहीशोबाला लगाम**...विवेक वेलणकर

१० **निवडणूक खर्चाचा घोळच!**...ॲड. कांतिलाल तातेड

१२ **राजकारण शुद्धीसाठी नारायण मूर्तींचाही एक प्रस्ताव**...यमाजी मालकर

१४ **निवडणुका : काळा पैसा आणि सफेद उपाय**...अर्थक्रांती

१६ **इटलीतील राजकीय अनिश्चितता**...परिमल माया सुधाकर

१९ **अनुत्पादित कर्जाचा बोजा**...वंदना धर्मधिकारी

२२ **सामाजिक विकासासाठी आर्थिक गुंतवणूक**...मनोज पांडकर

२५ **आध्यात्मिक अर्थकारण**...जया गोफणे

२८ **कर्जप्रकरणात : पर्सनल क्रेडिट रिपोर्ट**...आनंद वाडदेकर

२९ **शेअर बाजार अविवेकी ? पण मग आपण ??**...प्रसाद भागवत

३२ **म्युच्युअल फंड : उत्पन्न आणि आयकर** ...अरविंद जी. देशमुख

३६ **लाभदायक कमोडिटी ट्रेडिंग**...किरण सराफ

३९ **ऑप्शन्स ट्रेडिंगः 'इन द मनी' आणि 'आऊट ऑफ द मनी'**...संदीप साठे

४२ **पुणे तिथे आलिशान संपत्तीत गुंतवणूक!**...किशोर पाटे

५२ **अर्थपूर्ण कोडे**...विजय तरवडे



'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता **मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर** यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. ३१,३४ पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-७०२,साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे ४११०३८(सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले. **मुख्य संपादक : यमाजी मालकर**

# राजकारणाच्या शुद्धीकरणाचे मार्ग



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

**राजकारणाच्या माध्यमातून पैसा समाजाच्या डोक्यावर बसला आहे. त्याला सत्याचा रस्ता दाखवायचा तर त्याचे शुद्धीकरण झालेच पाहिजे. ते कसे होऊ शकते, याविषयीच्या विविध पर्यायांवर 'अर्थपूर्ण'ने या वेळी चर्चा केली आहे. आपल्याला ती सत्याच्या दिशेने नेण्यास उपयोगी ठरेल, असा विश्वास वाटतो.**

राजकीय व्यवस्थेने सामान्य नागरिकाचे असे नाक दाबले आहे की श्वास घ्यायचा म्हटले तरी त्या व्यवस्थेला शरण जावे लागते. मान्य आहे की देश चालविण्यासाठी राजकीय व्यवस्था लागते, मात्र ती जर नागरिकांच्या आयुष्यात इतकी ढवळाढवळ करत असेल तर तिचे जे महत्त्व आज प्रचंड वाढले आहे, ते कमी झाले पाहिजे. ते कमी कसे करता येईल, यासाठीचे प्रयत्न जगभर सुरू आहेत. पण हे होणार कसे?

एक मान्य केले पाहिजे की आपापले हितसंबंध सांभाळून 'जगा आणि जगू द्या' या तत्त्वाने जगा, अशी मानवी समूहांना मुभा दिली तरी ते ती अजिबात घेणार नाहीत. हितसंबंध याचा अर्थ प्रत्येकाने इतका वेगळा घेतला आहे की माझे ते माझे आणि तुझे किंवा तुमच्या सर्वांचे तेही माझेच, असे म्हणणारी माणसे या जगात वाढत चालली आहेत. त्यामुळेच नैसर्गिक साधनसंपत्ती आणि भौतिक संपत्तीची प्रचंड लूट चालली आहे. या लुटीत कोणी किती भाग घ्यायचा, यासाठी समूहांना पंच तर लागतोच. शिवाय तो कोणालाही आपल्यातला नको असतो. तो उच्चासनावर बसणारा हवा. अशी उच्चासनांवर बसणाऱ्या माणसांचा समूह म्हणजे राजकीय व्यवस्थेतील माणसे. थोडक्यात अशी राजकीय व्यवस्था ही समाज आणि देश चालविण्यासाठीची अपरिहार्यता आहे. पण मग तरीही या व्यवस्थेची मुजोरी आपल्याला का बोचते आहे?

जन्माला आलेल्या प्रत्येक माणसाला एक तर सत्ता हवी असते किंवा त्याला सत्याची तहान असते. याचा अर्थ आपल्या सर्वांचा जीवनसंघर्ष फक्त याच दोन कारणांसाठी चाललेला असतो. तिसरे काही आपल्याला सुचते का पहा. मग सत्तेसाठी माणसे का लढतात, हे लक्षात येते. सत्याचा शोध घेण्यापेक्षा सत्ता मिळविणे तुलनेने सोपे आहे. त्यामुळे अनेकांना सत्तेची तहान लागलेली असते. आपल्याला लक्षात येते की माणसाचा इतिहास सत्तेभोवतीच फिरतो आहे. त्या इतिहासात मुळात सत्ताकारणालाच महत्व प्राप्त झाले आहे. सामान्य माणसाचा इतिहास असा काही अस्तित्वातच नाही. त्या सामान्य माणसाला लाचारी जेव्हा अगदी असह्य झाली तेव्हा इतिहासात त्याने आपल्या खुणा निर्माण केल्या खऱ्या, मात्र त्यालाही राजकीय परिवर्तन म्हटले गेले आणि त्याचे नेतृत्व पुन्हा नव्या राजकीय व्यवस्थेनेच केले. राजकारण इतके सर्वव्यापी आहे तर ते नको असा सूर आपण का लावतो?

राजकारण म्हणजे काही फक्त देशाचे किंवा जगाचे राजकारण नव्हे. राजकारण तर जीवनाच्या सर्व क्षेत्रात असते. म्हणजे अगदी शहरात, गल्लीत, कार्यालयात, शाळेत, महविद्यालयात, सोसायटीत, आणि कधीकधी तर कुटुंबातही! आणि त्या सर्व समूहात आपण कोणाच्या तरी बाजूचे आणि कोणाच्या तरी विरोधात असतोच. म्हणजे आपणही राजकारण करतच असतो की. त्याचा आवाका आणि परिणाम छोटा असतो, असे फार तर म्हणता येईल. देशाच्या राजकारणाचा

आवाका मोठा असतो, एवढेच. त्यामुळेच महात्मा गांधींसारख्या नेत्यांनी सत्तेच्या केंद्रीकरणाला विरोध केला होता. स्थानिक ठिकाणची स्वायत्तता त्यांनी महत्त्वाची मानली होती. पण लक्षात असे आले की ती स्वायत्तता समाजाला झेपत नाही. त्याला वरून सत्ता गाजविणाराच कोणीतरी हवा असतो! असे का होत असेल?

मुळात राजकारणाचा उद्देश समजावून घेतला पाहिजे. म्हणजे ते जसे सत्ताकारण आहे तसेच ते व्यवस्था चालविण्यासाठीची एक प्रक्रिया आहे. अशी प्रक्रिया; जिच्या पद्धतीविषयी त्या समाजातील बहुतेकांचे एकमत झालेले असते. त्या प्रक्रियेत अनेक त्रुटी असू शकतात, मात्र ती त्या समाजाची एक प्रकारची मर्यादाही असते. ती त्या समाजाने एकप्रकारे स्वीकारलेली असते. त्यानुसार त्या त्या समूहाचे व्यवहार चाललेले असतात. आज आपण ज्या लोकशाहीत जगतो आहोत, तीही अशीच आपण स्वीकारलेली पद्धती आहे. पण मग त्या पद्धतीविषयी आपल्या मनात एवढा राग, अविश्वास का आहे?

राजकारणाला कोणताही पैलू घ्या. तो पैशांच्या व्यवहारांशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. त्याची सुरुवातच होते, निवडून येण्यासाठी खर्च केल्या जाणाऱ्या पैशांपासून. तो पैसा म्हणजे जणू गुंतवणूक झाली आहे. आता पैसा खर्च करायचा आणि नंतर तो दामदुप्पट काढून घ्यायचा. त्याला आपण 'भ्रष्टाचार' असे नाव देतो खरे. पण तो साधा व्यवहार आहे, असे म्हटले तर ते आपल्याला पटत नाही. कारण आपण राजकारणाला समाजसेवा समजतो. हे गृहीतकच मुळात चुकीचे आहे.

या सगळ्याच प्रश्नांची उत्तरे काय असू शकतात, याचा विचार निश्चितपणे करता येईल. झाले काय आहे पहा. आधुनिक जगाने सर्व मानवी व्यवहार आणि सुखदु:खांना चलनाच्या व्यवहाराशी बांधून टाकले आहे. राजकारण हा तर त्यातला अतिशय महत्त्वाचा व्यवहार आहे. आज आपल्या देशातील राजकारण त्या आर्थिक व्यवहारांशी जोडले गेले




आहे. म्हणजे ज्याला सत्ता हवी आहे, असे आपण म्हणतो, त्याचा अर्थ त्याला पैसा हवा आहे, असा झाला आहे.

राजकारणाला कोणताही पैलू घ्या. तो पैशांच्या व्यवहारांशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. त्याची सुरुवातच होते, निवडून येण्यासाठी खर्च केल्या जाणाऱ्या पैशांपासून. तो पैसा म्हणजे जणू गुंतवणूक झाली आहे. आता पैसा खर्च करायचा आणि नंतर तो दामदुप्पट काढून घ्यायचा. त्याला आपण 'भ्रष्टाचार' असे नाव देतो खरे. पण तो साधा व्यवहार आहे, असे म्हटले तर ते आपल्याला पटत नाही. कारण आपण राजकारणाला समाजसेवा समजतो. हे गृहीतकच मुळात चुकीचे आहे. त्यामुळे त्यावर बांधलेली सर्व इमारत तशीच तकलादू बनते आणि राजकारण कसे हवे, हे आपल्या एकप्रकारे निरर्थक गप्पा, परिसंवादाचा विषय होतो, ज्यातून म्हटले तर काहीच साध्य होत नाही. नाही म्हणायला आपण सत्याचा शोध घेत आहोत, असे बेगडी समाधान मात्र करून घेता येते.

या प्रश्नांची खरी उत्तरे मिळविण्यासाठी आजच्या जगातील पैशांचे व्यवहार समजून घ्यावे लागतील. राजकारणाच्या माध्यमातून पैसा असा समाजाच्या डोक्यावर बसला आहे. त्याला सत्याचा रस्ता दाखवायचा तर त्याचे शुद्धीकरण झालेच पाहिजे. ते कसे होऊ शकते, याविषयीच्या विविध पर्यायांवर 'अर्थपूर्ण'ने या वेळी चर्चा केली आहे. आपल्याला ती सत्याच्या दिशेने नेण्यास उपयोगी ठरेल, असा विश्वास वाटतो. ■